राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत पुरुषांच्या ग्रामीण विभागात जेएसडब्ल्यू संघाची जेतेपदाला गवसणी

# पुरुषांमध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट, महिला गटात बँक ऑफ बडोदाची बाजी !







**मुंबई** : राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत पुरुष ग्रामीण विभागात जेएसडब्ल्यू डोलवी संघाने सलग पाचव्यांदा विजेतेपद काबिज केले. त्याचप्रमाणे पुरुष शहर विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट, तर महिलांच्या गटात बँक ऑफ बडोदा संघाने बाजी मारली.

विजेत्या संघांना मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार भाई जगताप, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह विश्वास मोरे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

पुरुष ग्रामीण विभागात जेएसडब्ल्यू डोलवी विरुद्ध रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यात अंतिम लढत झाली. डोलवी संघाने त्यांच्यावर १९-१० असे वर्चस्व गाजवले. जितेश पाटील यांच्या चढाया व सुचित पाटील यांच्या पकडींच्या बळावर डोलवी संघाने विजय मिळवला. रायगडकडून समाधान मोरे, प्रशांत जाधव चांगले खेळले.

पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्टने बँक ऑफ बडोदाला ३५-१४ अशी धूळ चारली. सौरभ राऊत, ज्ञानेश्वर जाधव यांच्या चढाया व कृष्णा पवारच्या पकडींच्या बळावर त्यांनी यश संपादन केले. पराभूत संघाकडून चिन्मय गुरव, संभाजी बाबरे यांनी कडवी झुंज दिली. महिलांच्या विभागात बँक ऑफ बडोदाने आरबी स्पोर्ट्स संघाचा ५०-१६ असा फडशा पाडला. शुभदा खोतच्या उत्कृष्ट चढाया व पौर्णिमा जेधेच्या उत्तम बचावाच्या जोरावर त्यांनी दणदणीत विजय नोंदवला. आरबी स्पोर्ट्सकडून वैष्णवी चव्हाण, साक्षी भोईरने प्रतिकार केला. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संचलनाचा चषक लिहर कॉर्पोरेशन, नाशिक संघाने पटकावला.

## वैयक्तिक पुरस्कार विजेते

| विभाग | अष्टपैलू | चढाईपटू | पकडपटू |
|---|---|---|---|
| पुरुष ग्रामीण | राज पाटील | समाधान मोरे | पार्थ ठाकूर |
| पुरुष शहर | ज्ञानेश्वर जाधव | चिन्मय गुरव | तेजस टक्के |
| महिला शहर | हर्षा शेट्टी | हर्षदा हुंडारे | समरीन बुरणकर |

नवशक्ति Wed, 07 February 2024
https://epaper.freepressjournal.in/c/74517040

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas.in/
वृत्तमानस
मुंबई/ पालघर बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४ वर्ष- २७ अंक-२२८ पाने- ८ आर. १

# कामगार कबड्डी स्पर्धेत जे.एस.डब्लू. सलग पाचव्यांदा विजेते

## पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि महिला विभागात बँक ऑफ बडोदा अजिंक्य

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत पुरुष ग्रामीण जेएसडब्लू डोलवी संघाने सलग पाचव्यांदा जेतेपद मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तर पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि महिला खुला विभागात बँक ऑफ बडोदा अजिंक्य ठरले आहेत.

विजेत्या संघांना मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार अशोक उर्फ भाई जगताप, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, न्युज १८ लोकमतचे संपादक आशुतोष पाटील, मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह विश्वास मोरे, नवरोसजी वाडिया हॉस्पिटल सचिव दिलीप शहा, एच.आर.प्रमुख संतोष चव्हाण आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

पुरुष ग्रामीण विभागात जे.एस. डब्लू विरुद्ध रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यात अंतिम लढत झाली. पहिल्या डावात १२-१२ असा अत्यंत अटीतटीचा सामना बघायला मिळाला. दुसऱ्या डावात जेएसडब्ल्यूने राज पाटील, जितेश पाटील यांच्या चढाई आणि सूचित पाटीलच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १९ – १० अशी ९ गुणांची आघाडी घेत विजयी चषकावर




आपले नाव कोरले. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून समाधान मोरे, प्रशांत जाधव, विराज राणे यांनी केलेले प्रयत्न तोकडे ठरले. पुरुष शहरी विभागात अंतिम सामन्यात बँक ऑफ बडोदा विरुद्ध मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यातही कडवी झुंज बघायला मिळाली. पहिल्या डावात मुंबई पोर्ट ट्रस्टने सौरभ राऊत, ज्ञानेश्वर जाधव यांच्या उत्कृष्ट चढाई आणि कृष्णा पवार यांच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर ११–२१ अशी १० गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात बँक ऑफ बडोदाने कडवा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु मुंबई पोर्ट ट्रस्टने आक्रमक खेळ करत त्यांना १० – १४ अशा ४ गुणांच्या फरकाने मागे टाकले. हा सामना मुंबई पोर्ट ट्रस्टने २१ – ३५ अशा १४ गुणांच्या फरकाने सहज जिंकला. बँक ऑफ बडोदाकडून गजानन, चिन्मय गुरव, संभाजी बाबरे यांनी चांगला खेळ केला.

महिला खुला विभागात अंतिम सामना आर.बी.स्पोर्ट्स विरुद्ध बँक ऑफ बडोदा यांच्यात झाला. या सामन्यात पहिल्या डावापासून बँक ऑफ बडोदाचे वर्चस्व दिसून आले. बँक ऑफ बडोदाच्या आक्रमक खेळामुळे प्रतिस्पर्धी संघ पहिल्या डावात १०–२६ अशा तब्बल १६ गुणांनी पिछाडीवर होता. दुसऱ्या डावातही बँक ऑफ बडोदाने ०६–२४ अशा तब्बल २० गुणांची आघाडी घेत आर.बी.स्पोर्ट्सला खेळ सावरण्याची संधी दिली नाही. बँक ऑफ बडोदाने पूजा यादव, शुभदा खोत यांच्या उत्कृष्ट चढाई आणि पौर्णिमा जेधे हिच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १६ – ५० अशा ३४ गुणांच्या फरकाने सहज विजय मिळवला. प्रतिस्पर्धी संघाकडून वैष्णवी चव्हाण, साक्षी भोईर यांनी केलेला प्रतिकार निरुपयोगी ठरला.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# कबड्डी स्पर्धेत 'जेएसडब्ल्यू' विजेता



मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत पुरुष ग्रामीण जेएसडब्ल्यू डोलवी संघाने सलग पाचव्यांदा जेतेपद मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. तर पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि महिला खुला विभागात बँक ऑफ बडोदा अजिंक्य ठरले आहेत. विजेत्या संघांना मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार भाई जगताप, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह विश्वास मोरे, नवरोसजी वाडिया हॉस्पिटल सचिव दिलीप शहा, संतोष चव्हाण आदींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. पुरुष ग्रामीण विभागात जे.एस.डब्ल्यू विरुद्ध रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यात अंतिम लढत झाली. पहिल्या डावात १२-१२ असा अत्यंत अटीतटीचा सामना बघायला मिळाला. दुसऱ्या डावात जेएसडब्ल्यूचे राज पाटील, जितेश पाटील यांच्या चढाई आणि सूचित पाटीलच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १९ – १० अशी ९ गुणांची आघाडी घेत विजयी चषकावर आपले नाव कोरले. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून समाधान मोरे, प्रशांत जाधव, विराज राणे यांनी केलेले प्रयत्न तोकडे ठरले. पुरुष शहरी विभागात अंतिम सामन्यात बँक ऑफ बडोदा विरुद्ध मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यातही कडवी झुंज बघायला मिळाली. पहिल्या डावात मुंबई पोर्ट ट्रस्टने सौरभ राऊत, ज्ञानेश्वर जाधव यांच्या उत्कृष्ट चढाई आणि कृष्णा पवार यांच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर ११–२१ अशी १० गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात बँक ऑफ बडोदाने कडवा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु मुंबई पोर्ट ट्रस्टने आक्रमक खेळ करत त्यांना १० – १४ अशा ४ गुणांच्या फरकाने मागे टाकले. हा सामना मुंबई पोर्ट ट्रस्टने २१ – ३५ अशा १४ गुणांच्या फरकाने सहज जिंकला. बँक ऑफ बडोदाकडून गजानन, चिन्मय गुरव, संभाजी बाबरे यांनी चांगला खेळ केला.

पुण्य नगरी

# कामगार कबड्डी स्पर्धेत जेएसडब्ल्यू सलग पाचव्यांदा विजयी

## पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट तर महिलांत बँक ऑफ बडोदा अजिंक्य

**मुंबई** :राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत जेएसडब्ल्यू डोलवी संघाने सलग पाचव्यांदा जेतेपद मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. पुरुष शहरी विभागात मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि महिलांत बँक ऑफ बडोदा संघाने बाजी मारली.

पुरुष ग्रामीण विभागात जेएसडब्ल्यू विरुद्ध रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यात अंतिम लढत झाली. पहिल्या डावात १२-१२ असा अत्यंत अटीतटीचा सामना बघायला मिळाला. दुसऱ्या डावात जेएसडब्ल्यूने राज पाटील, जितेश पाटील यांच्या चढाई आणि सूचित पाटीलच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १९-१० अशी ९ गुणांची आघाडी घेत चषकावर आपले नाव कोरले. पुरुष शहरी विभागात बँक ऑफ बडोदा विरुद्ध मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यातही कडवी झुंज बघायला मिळाली. पहिल्या डावात पोर्ट ट्रस्टने सौरभ राऊत, ज्ञानेश्वर जाधव यांच्या उत्कृष्ट चढाई आणि कृष्णा पवार यांच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर ११-२१ अशी १० गुणांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात बडोदाने कडवा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; परंतु पोर्ट ट्रस्टने आक्रमक खेळ करत त्यांना १०-१४ अशा ४ गुणांच्या फरकाने मागे टाकले. पोर्ट ट्रस्टने २१-३५ अशा १४ गुणांच्या फरकाने बाजी मारली. महिला खुल्या विभागातील अंतिम सामना आर. बी. स्पोर्ट्स विरुद्ध बँक ऑफ बडोदा यांच्यात झाला. या सामन्यात पहिल्या डावापासून



बडोदाचे वर्चस्व दिसून आले. बडोदाच्या आक्रमक खेळामुळे प्रतिस्पर्धी संघ पहिल्या डावात १०-२६ अशा तब्बल १६ गुणांनी पिछाडीवर होता. दुसऱ्या डावातही बडोदाने २४-६ अशा तब्बल २० गुणांची आघाडी घेत आर. बी. स्पोर्ट्सला खेळ सावरण्याची संधी दिली नाही. बडोदाने पूजा यादव, शुभदा खोत यांच्या उत्कृष्ट चढाई आणि पौर्णिमा जेधेच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर ५०-१६ अशा ३४ गुणांच्या फरकाने सहज विजय मिळवला.

ग्रामीण पुरुष विभागाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेएसडब्ल्यू डोलवी विरुद्ध खुशबू आईस्क्रीम यांच्यात २६-२६ अशी कडवी झुंज बघालया मिळाली. पहिल्या डावात जेएसडब्ल्यूने १४-१३ अशी एका गुणाची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात १२-१३ गुणांसह खुशबू आईस्क्रीमने एका गुणाची आघाडी घेत सामना २६-२६ असा बरोबरीवर आणला. त्यानंतर प्रत्येक संघांना पाच डाव चढाईची संधी देण्यात आली. त्यात जेएसडब्ल्यूने ७-३ अशी ४ गुणांची आघाडी घेत संधीचे सोने केले.

■ विजेत्या संघांना मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार अशोक ऊर्फ भाई जगताप, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, न्यूज १८ लोकमतचे संपादक आशुतोष पाटील, मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह विश्वास मोरे, नवरोसजी वाडिया हॉस्पिटल सचिव दिलीप शहा, एच. आर. प्रमुख संतोष चव्हाण आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

शब्दांना सत्याची धार
प्रहार
मुंबई ● मंगळवार, ६ फेब्रुवारी २०२४

# कामगार कबड्डी स्पर्धेत जे. एस. डब्ल्यू. सलग पाचव्यांदा विजयी

◆ मुंबई (वार्ताहर) :

राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेत जे. एस. डब्ल्यू. डोलवी संघाने सलग पाचव्यांदा जेतेपद मिळवत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. पुरुष ग्रामीण विभागात जे. एस. डब्ल्यू विरुद्ध रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यात अंतिम लढत झाली. पहिल्या डावात १२-१२ असा अत्यंत अटीतटीचा सामना बघायला मिळाला. दुसऱ्या डावात जेएसडब्ल्यूने राज पाटील, जितेश पाटील यांच्या चढाई आणि सूचित पाटीलच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १९-१०अशी ९ गुणांची आघाडी घेत विजयी चषकावर आपले नाव कोरले.

बँक ऑफ बडोदा विरुद्ध मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यातही कडवी झुंज बघायला मिळाली. बँक ऑफ



**पुरुष संघात मुंबई पोर्ट ट्रस्ट**

**महिला संघात बँक ऑफ बडोदा अजिंक्य**

बडोदाच्या आक्रमक खेळामुळे प्रतिस्पर्धी संघ पहिल्या डावात १०-२६ अशा तब्बल १६ गुणांनी पिछाडीवर होता. दुसऱ्या डावातही बँक ऑफ बडोदाने ०६-२४ अशा तब्बल २० गुणांची आघाडी घेत आर. बी. स्पोर्ट्सला खेळ सावरण्याची संधी दिली नाही, तर महिला संघात बँक ऑफ बडोदाने पूजा यादव, शुभदा खोत यांच्या उत्कृष्ट चढाई आणि पौर्णिमा जेधे हिच्या उत्कृष्ट पकडीच्या जोरावर १६-५० अशा ३४ गुणांच्या फरकाने सहज विजय मिळवला. प्रतिस्पर्धी संघाकडून वैष्णवी चव्हाण, साक्षी भोईर यांनी केलेला प्रतिकार निरुपयोगी ठरला. ग्रामीण पुरुष विभागाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेएसडब्ल्यू डोलवी विरुद्ध खुशबू आईस्क्रीम यांच्यात २६-२६ अशी कडवी झुंज बघालया मिळाली. स्पर्धेत एकूण ११५ संघांनी सहभाग घेतला होता. विजेत्या संघांना कबड्डी असो.चे अध्यक्ष आमगार अशोक ऊर्फ भाई जगताप, कामगार कल्याण आयुक्त रवीराज इळवे, न्युज १८ लोकमतचे संपादक आशुतोष पाटील, मुंबई शहर कबड्डी असो. चे प्रमुख कार्यवाह विश्वास मोरे, नवरोसजी वाडिया हॉस्पिटलचे सचिव दिलीप शहा, संतोष चव्हाण आदींच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

नवराष्ट्र

# राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन

## राज्यभरातून ५७ पुरुष, ५३ महिला असे ११० संघ स्पर्धेत सहभागी



**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या २७ व्या आणि महिलांच्या २२ व्या खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे शुक्रवारी उद्‌घाटन करण्यात आले.

आमदार कालिदास कोळंबकर, विकास आयुक्त डॉ.एच.पी. तुम्मोड, कामगार विभागाचे उपसचिव दादासाहेब खताळ, उपसचिव दीपक पोकळे, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एड.अनिल ढुमणे, ज्येष्ठ कबड्डीपटू जया शेट्टी, छाया शेट्टी, भाग्यश्री भुर्के, बाळ वडावलीकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा पार पडला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवनाच्या मैदानात दररोज सायंकाळी ४ वाजेपासून स्पर्धेचे सामने खेळवले जातील. सोमवार ५ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडेल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटात सामने खेळवले जातील. राज्यभरातून ११० संघ स्पर्धेत सहभागी झाले असून यात ५७ संघ पुरुष कामगारांचे असून महिला खुला गटातून ५३ संघ सहभागी झाले आहेत.

Mumbai Plus Edition
04 February 2024 Page No. 3
epaper.navarashtra.com

पुण्य नगरी

# राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन



**मुंबई** : औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या २७व्या आणि महिलांच्या २२व्या खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे शुक्रवारी उद्घाटन करण्यात आले. आ. कालिदास कोळंबकर, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार विभागाचे उपसचिव दादासाहेब खताळ, उपसचिव दीपक पोकळे, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे, ज्येष्ठ कबड्डीपटू जया शेट्टी, छाया शेट्टी, भाग्यश्री भुर्के, बाळ वडावलीकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवनाच्या मैदानात दररोज सायंकाळी ४ वाजेपासून स्पर्धेचे सामने खेळवले जातील. सोमवार, ५ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडेल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटांत सामने खेळवले जातील. राज्यभरातून ११० संघ स्पर्धेत सहभागी झाले असून, यात ५७ संघ पुरुष कामगारांचे असून, महिला खुला गटातून ५३ संघ सहभागी झाले आहेत.

Smart Mumbai Edition
Feb 3, 2024 Page No. 04
Powered by : eReleGo.com

शब्दांना सत्याची धार
प्रहार



# राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

औद्योगिक आणि व्यावसायिक कामगारांच्या २७व्या आणि महिलांच्या २२व्या खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे प्रभादेवीच्या कामगार क्रीडा भवन, येथे शुक्रवारी उद्घाटन करण्यात आले. आमदार कालिदास कोळंबकर, विकास आयुक्त (असंघटीत कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार विभागाचे उपसचिव दादासाहेब खताळ, उपसचिव दीपक पोकळे, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अॅड. अनिल ढुमणे, ज्येष्ठ कबड्डीपटू जया शेट्टी, छाया शेट्टी, भाग्यश्री भुर्के, बाळ वडावलीकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला.

प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवनाच्या मैदानात दररोज सायंकाळी ४ वाजल्यापासून स्पर्धेतील सामने खेळवले जातील. सोमवार ५ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडेल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटात सामने खेळवले जातील. राज्यभरातून ११० संघ स्पर्धेत सहभागी झाले असून त्यात ५७ संघ पुरुष कामगारांचे असून महिला खुला गटातून ५३ संघ सहभागी झाले आहेत.

Mumbai Edition
Feb, 03 2024 Page No, 2
https://epaper.prahaar.in

मुंबई तरुण भारत
Main Edition | 2024-02-02 | Page- 3
epaper.mahamtb.con

# मुंबईत आजपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा

**मुंबई :** औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा शुक्रवार, दि. २ ते ५ फेब्रुवारीदरम्यान प्रभादेवीतील कामगार क्रीडा भवन येथे होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता होणार आहे. यावेळी कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे, शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) डॉ. रविंद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच.पी.तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दैनिक यशोभूमि

# श्रमिक कबड्डी प्रतियोगिता का उद्घाटन

**मुंबई(यशोडेस्क)**, 27वें औद्योगिक और व्यावसायिक



श्रमिक और 22वें महिला ओपन स्टेट कबड्डी टूर्नामेंट का उद्घाटन शुक्रवार ,2 फरवरी को कामगार क्रीड़ा भवन, प्रभादेवी, मुंबई में किया गया। इस दौरान विधायक कालिदास कोलंबकर ,विकास आयुक्त (असंगठित कामगार) डॉ.एच.पी.तुम्मोड, श्रम विभाग के उपसचिव दादासाहेब खताल , उपसचिव दीपक पोकले , कामगार कल्याण आयुक्त रविराज इलवे, भारतीय मजदूर संघ के महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एड.अनिल ढुमणे, वरिष्ठ कबड्डी खिलाडी जया शेट्टी, छाया शेट्टी, भाग्यश्री भुर्के, बाल वडावलीकर सहित अन्य गणमान्य व्यक्ति उपस्थित थे। टूर्नामेंट के मैच प्रतिदिन शाम 4 बजे से प्रभादेवी स्थित महाराष्ट्र श्रम कल्याण बोर्ड के कामगार क्रीड़ा भवन मैदान पर खेले जाएंगे। प्रतियोगिता का पुरस्कार वितरण समारोह सोमवार, 5 फरवरी को आयोजित किया जायेगा। मैच तीन ग्रुपों में खेले जाएंगे।

**पुरस्कार वितरण पांच को**

मुंबई चौफेर

# शुक्रवारपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा

मुंबई - औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या शुक्रवारपासून (२ फेब्रुवारी) कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे सुरू होत आहे.

स्पर्धेचा उद्घाटन शुक्रवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) डॉ. रवींद्र कुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

सोमवार, ५ फेब्रुवारीपर्यंत स्पर्धा सुरू राहील. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटांत स्पर्धेचे सामने खेळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघांना प्रत्येकी रु. ५०,०००, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी रु. ३५,०००, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी रु. २०,००० बक्षिसे दिली जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल.

Mumbai Choufer
01 Feb 2024 -Page 10

क्रीडा
@PrahaarNewsLive
प्रहार
९ मुंबई
गुरुवार, १ फेब्रुवारी २०२४
www.prahaar.in
epaper.prahaar.in

# मुंबईत शुक्रवारपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धांचे आयोजन

मुंबई : औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७वी आणि महिलांची २२वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या शुक्रवारपासून (दि.२) फेब्रुवारीपासून कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे सुरू होत आहे. सोमवार दि. ५ फेब्रुवारीपर्यंत स्पर्धा सुरू राहील.

स्पर्धेचा उद्घाटन शुक्रवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहूल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अप्पर पोलिस महासंचालक (वाहतूक) डॉ. रवींद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी ५०,००० रुपये, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी रु. ३५,००० रुपये, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी रु.२०,००० रुपये बक्षीस दिले जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल.

नवराष्ट्र

# उद्यापासून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा रंगणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या शुक्रवारपासून कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे सुरु होत आहे. स्पर्धेचा उद्घाटन शुक्रवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहूल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) डॉ.रविंद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटीत कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सोमवारपर्यंत स्पर्धा सुरू राहणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

Mumbai Plus Edition
01 February 2024 Page No. 3
epaper.navarashtra.com

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# पुरुष व महिला औद्योगिक कामगारांसाठी २ फेब्रुवारीला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

by Team DGIPR

January 31, 2024

in वृत्त विशेष

मुंबई, दि. ३१ :- राज्य कामगार विभागांतर्गत कामगार कल्याणासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने औद्योगिक व व्यावसायिक पुरुष कामगारांसाठी २७ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आणि महिलांसाठी २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २ ते ५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आयोजित केली आहे. ही स्पर्धा हुतात्मा बाबू गेनू, गिरणी कामगार क्रीडा भवन प्रभादेवी, येथे होणार आहे.

या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन २ फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजता कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे आणि शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, अपर पोलीस महासंचालक डॉ.रवींद्रकुमार सिंगल आदींच्या उपस्थितीत होणार आहे.

विकास आयुक्त डॉ.एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे यावेळी उपस्थित राहणार आहेत, असे कळविण्यात आले आहे.

0000

मनीषा सावळे/विसंअ/

पुण्य नगरी

# मुंबईत उद्यापासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा

**मुंबई :** औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ बी आणि महिलांची २२ बी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दि. २ फेब्रुवारी पासून कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे सुरू होत आहे.

स्पर्धेचा उद्घाटन शुक्रवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) डॉ. रवींद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. ५ फेब्रुवारीपर्यंत स्पर्धा सुरू राहील. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटांत स्पर्धेचे सामने खळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटांतील अंतिम विजेत्या संघांना प्रत्येकी ५० हजार रुपये, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५ हजार रुपये, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी २० हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात येईल.

# मुंबईत शुक्रवारपासून राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या शुक्रवारपासून (दि.२ फेब्रुवारी) कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई येथे सुरु होत आहे.

स्पर्धेचा उद्घाटन शुक्रवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहूल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) डॉ.रविंद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटीत कामगार) डॉ.एच.पी.तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

सोमवार दि.5 फेब्रुवारीपर्यंत स्पर्धा सुरु राहील. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी रु.५०,०००/-, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी रु.३५,०००/-, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी रु.२०,०००/- बक्षिस दिले जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल.

पुण्य नगरी

# कामगार कबड्डी स्पर्धा २ फेब्रुवारीपासून

**मुंबई** : औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी आणि महिलांसाठी २२ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या २ ते ५ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे ही स्पर्धा होईल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला अशा तीन गटांत स्पर्धेचे सामने खेळवले जातील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २० जानेवारी आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका, नियमावली मंडळाच्या ६६६.स्त्र६ु॒' '६ु.ष्ठ या संकेतस्थळावर आणि मंडळाच्या राज्यातील सर्व विभागीय व गट कार्यालय तसेच कामगार कल्याण केंद्रात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या विविध कंपन्या, कारखाने आदी आस्थापनांच्या पुरुष संघांना स्पर्धेत भाग घेता येणार आहे, तर महिला संघांसाठी ही स्पर्धा खुली असेल. तिन्ही गटांतील अंतिम विजेत्या संघांना प्रत्येकी ५०,००० रुपये, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५,००० रुपये, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी २०,००० रुपये बक्षिसे दिली जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात येईल. मुंबई व ठाणेवगळता बाहेरगावाहून येणाऱ्या संघांना निवास व भोजन व्यवस्थेसाठी प्रतिदिन ४००० रुपये दिले जातील. तसेच महिलांच्या मुंबई व ठाणे येथील संघांना प्रतिदिन १००० रुपये प्रवास खर्चासाठी दिले जातील. कामगार पुरुष संघासाठी ३०० रुपये आणि महिला संघासाठी २०० रुपये प्रवेश शुल्क असेल. प्रवेशिका व प्रवेश शुल्क हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई तेथे स्वीकारल्या जातील. जास्तीत जास्त संघांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

Smart Mumbai Edition
Dec 23, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com

# कामगार कबड्डी स्पर्धेचे लवकरच आयोजन

**मुंबई** : औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७वी आणि महिलांसाठी २२वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या २ ते ५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे ही स्पर्धा होईल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला अशा तीन गटांत स्पर्धेचे सामने खळवले जातील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २० जानेवारी असून अधिक माहितीसाठी मंडळाच्या WWW.PUBLIC.MLWB.IN या संकेतस्थळांवर आणि मंडळाच्या राज्यातील सर्व विभागीय व गट कार्यालय तसेच कामगार कल्याण केंद्रांना भेट द्यावी.

नव शक्ति
Sat, 23 December 2023
https://epaper.freepressjournal.i

नवराष्ट्र

# २ फेब्रुवारीपासून कबड्डीपटू भिडणार !

## औद्योगिक, व्यावसायिक कामगारांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**मुंबई,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी आणि महिलांसाठी २२ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या २ ते ५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी येथे ही स्पर्धा होणार आहे. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खळवले जातील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका, नियमावली मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळांवर आणि मंडळाच्या राज्यातील सर्व विभागीय व गट कार्यालय तसेच कामगार कल्याण केंद्रात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या विविध कंपन्या, कारखाने आदी आस्थापनांच्या पुरुष संघांना स्पर्धेत भाग घेता येणार आहे, तर महिला संघांसाठी ही स्पर्धा खुली असेल.

### विजेत्या संघाला ५० हजारांचे बक्षीस

तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी ५० हजार रुपये, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५ हजार, अंतिम उपांत्य उपविजेता संघांना प्रत्येकी २० हजारांचे बक्षिसे दिली जातील. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल. मुंबई व ठाणे वगळता बाहेरगावाहून येणाऱ्या संघांना निवास व भोजन व्यवस्थेसाठी प्रतिदिन ४ हजार दिले जाणार आहे.

### मुंबई, ठाण्यातील संघांसाठी प्रवास खर्चही मिळणार

महिलांच्या मुंबई व ठाणे येथील संघांना प्रतिदिन १ रुपये प्रवास खर्चासाठी दिले जातील. कामगार पुरुष संघासाठी ३०० आणि महिला संघासाठी २०० प्रवेश शुल्क असेल. प्रवेशिका व प्रवेश शुल्क हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई तेथे स्विकारल्या जातील. जास्तीतजास्त संघांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# कामगार कबड्डी स्पर्धा २ फेब्रुवारीपासून

**मुंबई (प्रतिनिधी) :** औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी आणि महिलांसाठी २२ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा येत्या २ ते ५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे ही स्पर्धा होईल. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खळवले जातील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका, नियमावली मंडळाच्या www.public.mlwb.in या संकेतस्थळांवर आणि मंडळाच्या राज्यातील सर्व विभागीय व गट कार्यालय तसेच कामगार कल्याण केंद्रात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या विविध कंपन्या, कारखाने आदी आस्थापनांच्या पुरुष संघांना स्पर्धेत भाग घेता येणार आहे, तर महिला संघांसाठी ही स्पर्धा खुली असेल. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी रु. ५०,०००, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी रु. २५,०००, अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी रु. २०,००० बक्षिसे दिली जातील.

तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल. मुंबई व ठाणे वगळता बाहेरगावाहून येणाऱ्या संघांना निवास व भोजन व्यवस्थेसाठी प्रतिदिन रु. ४,००० दिले जातील. तसेच महिलांच्या मुंबई व ठाणे येथील संघांना प्रतिदिन रु. १,००० प्रवास खर्चासाठी दिले जातील. कामगार पुरुष संघासाठी रु. ३०० आणि महिला संघासाठी रु. २०० प्रवेश शुल्क असेल. प्रवेशिका व प्रवेश शुल्क हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई तेथे स्वीकारल्या जातील. जास्तीत जास्त संघांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.



# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धा आणि

महिलांसाठी २२ वी खुली कब्बडी स्पर्धा २०२३-२४

दिनांक ०२/०२/२०२४ ते ०५/०२/२०२४

## अंतिम निकालपत्र

### सर्वोत्कृष्ट संघ - पुरुष शहर

| विभाग | संघाचे नाव |
|---|---|
| अंतिम विजेता | मुंबई पोर्ट प्राधिकरण, मुंबई |
| अंतिम उपविजेता | बँक ऑफ बडोदा, मुंबई |
| उपांत्य उपविजेता | न्यू इंडिया इन्शुरन्स, मुंबई |
| उपांत्य उपविजेता | रिझर्व बँक, मुंबई |

### स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू - पुरुष शहर

| विभाग | खेळाडूचे नाव | संघाचे नाव |
|---|---|---|
| सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू | ज्ञानेश्वर जाधव | मुंबई पोर्ट प्राधिकरण |
| सर्वोत्तम चढाई | चिन्मय गुरव | बँक ऑफ बडोदा |
| सर्वोत्तम क्षेत्ररक्षण (पकड) | तेजस टक्के | रिझर्व बँक ऑफ इंडिया |

निरिक्षकांची स्वाक्षरी

१) २) ३)

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धा आणि महिलांसाठी २२ वी खुली कब्बडी स्पर्धा २०२३-२४

दिनांक ०२/०२/२०२४ ते ०५/०२/२०२४

अंतिम निकालपत्र

सर्वोत्कृष्ट संघ - महिला

| विभाग | संघाचे नाव |
|---|---|
| अंतिम विजेता | बँक ऑफ बडोदा |
| अंतिम उपविजेता | आर. बी. एल. सी क्लब, मुंबई |
| उपांत्य उपविजेता | अमरहिंद मंडळ, |
| उपांत्य उपविजेता | शिवशक्ती, मुंबई |

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू - महिला

| विभाग | खेळाडूचे नाव | संघाचे नाव |
|---|---|---|
| सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू | हर्षा शेट्टी | आर. बी. एल. सी |
| सर्वोत्तम चढाई | हर्षदा हुंडारे | बँक ऑफ बडोदा |
| सर्वोत्तम क्षेत्ररक्षण (पकड) | समरिन बुरगकर | बँक ऑफ बडोदा, |

निरिक्षकांची स्वाक्षरी

१)

२)

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७ वी राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धा आणि महिलांसाठी २२ वी खुली कब्बडी स्पर्धा २०२३-२४

दिनांक ०२/०२/२०२४ ते ०५/०२/२०२४

### अंतिम निकालपत्र

सर्वोत्कृष्ट संघ - पुरुष ग्रामिण

| विभाग | संघाचे नाव |
|---|---|
| अंतिम विजेता | जे. एस. डब्लू, डोलवी |
| अंतिम उपविजेता | रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक |
| उपांत्य उपविजेता | कुपर कॉर्पोरेशन, सातारा |
| उपांत्य उपविजेता | रायगड फूडस् डिस्ट्रीब्युटर्स खुरावले, रायगड |

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू - पुरुष ग्रामिण

| विभाग | खेळाडूचे नाव | संघाचे नाव |
|---|---|---|
| सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू | राज पाटील | जे. एस. डब्लू |
| सर्वोत्तम चढाई | समाधान भोरे | आर. डी. सी बँक |
| सर्वोत्तम क्षेत्ररक्षण (पकड) | पार्थ ठाकूर | रायगड फूडस् डिस्ट्रीब्युटर्स |

निरिक्षकांची स्वाक्षरी

१) २) ३)


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
(महाराष्ट्र शासन)
औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची खुली २२ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२४
पारितोषिक वितरण समारंभ


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
(महाराष्ट्र शासन)
औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची खुली २२ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२४
पारितोषिक वितरण समारंभ


महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
(महाराष्ट्र शासन)
औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची खुली २२ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२४
पारितोषिक वितरण समारंभ

सकाळ

## दृष्टिक्षेपात

# मुंबईत राज्यस्तरीय कामगार कबड्डीचा थरार; उद्यापासून प्रभादेवीत स्पर्धेला सुरुवात

मुंबई : औद्योगिक आणि व्यावसायिक कामगारांची २७ वी आणि महिलांची २२ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा शुक्रवारपासून (ता. २) प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवन मैदानात सुरू होत आहे. या स्पर्धेत राज्यातून १०० संघ सहभागी होणार आहेत. तीन दिवस या स्पर्धा रंगणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार राहुल शेवाळे, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) डॉ. रवींद्रकुमार सिंगल, विकास आयुक्त (असंघटित कामगार) डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार आयुक्त सतीश देशमुख, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, कल्याण आयुक्त रविराज इळवे आदींच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला खुला अशा तीन गटांत स्पर्धेचे सामने खळवले जातील. राज्यभरातून सुमारे १०० संघ स्पर्धेत सहभागी होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघांना प्रत्येकी ५० हजार, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५ हजार, तर अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी २० हजार रुपयाचे बक्षीस दिले जाईल. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.

Mumbai, Mumbai-Today
01/02/2024 Page No. 2